# कोल्हापूर महानगरपालिका परिवहन उपक्रम

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २० मधील तरतुदीनुसार १ एप्रिल १९६२ रोजी परिवहन उपक्रमाची स्थापना करणेत आली. कोल्हापूर शहरातील नागरिकांना किफायतशीर प्रवास भाड्यात वक्तशीर व विश्वासार्ह प्रवासी सेवा देणेसाठी परिवहन उपक्रमाची बस सेवा सुरु करणेत आली आहे. परिवहन उपक्रमामार्फत कोल्हापूर शहर, लगतची उपनगरे आणि महानगरपालिका हद्दीपासून १५ ते २० कि.मी. परिघक्षेत्रातील ग्रामिण भागातील काही मार्गांवर शहरी बस सेवा पुरविण्यात येते.

परिवहन उपक्रमाकडे नोव्हेंबर २०१३ मध्ये जेएनएनयुआरएम योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या ७५ बसेससह एकूण १२९ बसेसचा ताफा असून, त्यातील १११ बसेस दैनंदिन मार्गस्थ असतात. शहरातील एकूण ५ वाहतूक नियंत्रण केंद्रांवरुन विविध मार्गांवर धांवणाऱ्या १२९ बसेसचे नियंत्रण केले जाते. छ. शिवाजी महाराज चौक येथे परिवहन उपक्रमाचे मध्यवर्ती वाहतूक नियंत्रण केंद्र आहे. परिवहन उपक्रमाची महाराणा प्रताप चौक व गंगावेश येथे पास वितरण केंद्रे असून, ती सकाळी ०८.०० ते रात्रौ. ०८.०० या वेळेमध्ये आठवड्याच्या सर्व दिवशी सुरु असतात. सदर पास वितरण केंद्रांवरुन संगणकीकृत ओळखपत्रे व पासेसचे वितरण करणेत येते. विद्यार्थी ओळखपत्र नुतनीकरणासाठी रु.१५/- प्रतिवर्षी व अन्य पासधारकांच्या ओळखपत्र नुतनीकरणासाठी रु.२०/- प्रतिवर्षी असा दर निश्चित करणेत आला आहे. सदरचे ओळखपत्र एक वर्ष कालावधीसाठी वैध राहील. सदर ओळखपत्राद्वारे कोणताही सवलत पास संगणकीकृत पास वितरण केंद्रामध्ये मिळू शकेल.

के.एम.टी. बसेसच्या प्रवासी संख्येमध्ये व त्या अनुषंगने उत्पन्नामध्ये वाढ होणेसाठी चालक-वाहकांना एप्रिल २०१६ पासून ''प्रोत्साहन भत्ता'' योजना अंमलात आणली असून, त्यामध्ये अपेक्षित उत्पन्नापेक्षा जादा उत्पन्न प्राप्त करणाऱ्या चालक-वाहकांना जादा प्राप्त केलेल्या उत्पन्नाच्या ५ टक्के रक्कम प्रोत्साहन भत्ता म्हणून मासिक पगाराबरोबर आदा केली जाते. त्याचप्रमाणे सवलत पासधारक प्रवाशांसाठी ''सुवर्ण बक्षिस योजना'' माहे जून २०१६ पासून अंमलात आणणेत आली असून, त्याप्रमाणे संपूर्ण महिन्यामध्ये वितरीत करणेत आलेल्या पासेसमधून लकी ड्रॉ द्वारे तीन भाग्यवान क्रमांकांची निवड करुन त्यांना अनुक्रमे प्रथम विजेत्यास - ३ ग्रॅम सोने, द्वितीय विजेत्यास - २ ग्रॅम सोने व तृतीय विजेत्यास - १ ग्रॅम सोने बक्षीस म्हणून वितरत करणेत येते. सदर बक्षीसाचे प्रायोजकत्व कोल्हापूर शहरातील नामवंत व्यक्तींकडून स्वीकारणेत येते.

परिवहन उपक्रमाचे मुख्य कार्यालय श्री शाहू क्लॉथ मार्केट, उत्तर कक्ष, पहिला मजला, 'सी' वॉर्ड, सोमवार पेठ, कोल्हापूर - ४१६ ००२ येथे आहे. दुरध्वनी

क्र. (०२३१) २६४४५६६ ते २६४४५७१ फॅक्स क्र. (०२३१) २६४४६०८ असा आहे. परिवहन उपक्रमाच्या बसेसच्या देखभाल-दुरुस्तीचे काम मुख्य यंत्रशाळा, शास्त्रीनगर येथे करणेत येते.

**परिवहन उपक्रमाकडून शहर व परिसरातील उपनगराव्यतिरिक्त २८ मार्गाद्वारे १५ ते २० कि.मी. परिघक्षेत्रातील ५८ गावाना प्रवासी सेवा दिली जाते :**

| अ.क्र | मार्गाचे नांव |
|---|---|
| १ | साने गुरुजी वसाहत, राजोपाध्ये नगर, आपटे नगर, क्रांतीसिह नानापाटील नगर, जिवबानाना जाधव पार्क, |
| २ | राजारामपुरी, शिवाजी विद्यापीठ |
| ३ | फुलेवाडी, बोंद्रे नगर, लक्षतिर्थ वसाहत |
| ४ | मार्केट यार्ड, संत गोराकुंभार वसाहत |
| ५ | पांचगाव, शांतीनगर |
| ६ | सुर्वेनगर, साळोखेनगर, कळंबा, कात्यायनी |
| ७ | शुगरमिल, कसबा बावडा |
| ८ | भोसलेवाडी, कदमवाडी |
| ९ | आर.के. नगर, जरगनगर, एस.एस.सी. बोर्ड, |
| १० | वडणगे, निगवे, भुयेवाडी, भुये, जठारवाडी, |
| ११ | गांधीनगर, वळीवडे, चिंचवाड |
| १२ | उचगांव, मुडशिंगी, |
| १३ | हणमंतवाडी, शिंगणापूर |
| १४ | टोप, संभापुर, पेठवडगाव, |
| १५ | मोरेवाडी, कंदलगाव, के.आय.टी. |

| अ.क्र | मार्गाचे नांव |
|---|---|
| १६ | कुडीत्रे गाव, |
| १७ | शिरोली, (माळवाडी) एम.आय.डी.सी. नागाव |
| १८ | हालोंडी, हेर्ले, माले, चोकाक, अतिग्रे, रुकडी, , |
| १९ | माणगाव, घोडावत कॉलेज |
| २० | मौजेवडगांव |
| २१ | कोगे, बहिरेश्वर, म्हारुळ |
| २२ | कणेरी मठ, कोगील खुर्द, |
| २३ | सरनोबतवाडी,उजळाईवाडी, गोकुळ शिरगाव, पंचतारांकीत एमआयडीसी, कणेरीवाडी, विकासवाडी, कागल |
| २४ | बालींगा, पाडळी खुर्द,महे,बिड शेड, शिरोली दुमाला, |
| २५ | इस्पुर्ली, हणबरवाडी, दिंडनेर्ली फाटा, बाचणी, |
| २६ | येवती, चुये, |
| २७ | शिये |
| २८ | पिराचीवाडी, वाशी, कांडगांव, हळदी बाचणी |

**परिवहन उपक्रमासाठी प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, कोल्हापूर यांनी मान्यता दिलेले बस भाडे पत्रक खालीलप्रमाणे आहे : (अंमल दि.२५/०१/२०१५)**

| प्रवासाचे अंतर (किलोमिटरमध्ये) | पूर्ण आकार | अर्ध आकार |
|---|---|---|
| २ | ७.०० | ४.०० |
| ४ | ८.०० | ४.०० |
| ६ | १०.०० | ५.०० |
| ८ | ११.०० | ६.०० |
| १० | १२.०० | ६.०० |
| १२ | १४.०० | ७.०० |
| १४ | १६.०० | ८.०० |
| १६ | १८.०० | ९.०० |
| १८ | १९.०० | १०.०० |
| २० | २०.०० | १०.०० |
| २२ | २१.०० | ११.०० |
| २४ | २२.०० | ११.०० |
| २६ | २३.०० | १२.०० |
| २८ | २४.०० | १२.०० |
| ३० | २५.०० | १३.०० |
| ३२ | २६.०० | १३.०० |
| ३४ | २७.०० | १४.०० |
| ३६ | २८.०० | १४.०० |
| ३८ | २९.०० | १५.०० |
| ४० | ३०.०० | १५.०० |

**परिवहन उपक्रमाकडून विविध प्रवासी वर्गासाठी देण्यात असलेली प्रवासी भाड्यातील सवलत खालीलप्रमाणे आहे :**

| अ.क्र. | प्रवासी वर्ग | सवलत प्रमाण |
|---|---|---|
| १. | माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण घेणारे विद्यार्थी | ५० टक्के |
| २. | कोल्हापूर महानगरपालिका हद्दीतील स्वातंत्र्यसैनिक व स्वातंत्र्यसैनिकांच्या विधवा पत्नी | १०० टक्के |
| ३. | कोल्हापूर महानगरपालिका हद्दीतील मूक-बधीर, कर्णबधीर, मतिमंद विद्यार्थी व एक सोबती तसेच | १०० टक्के |

| अ.क्र. | प्रवासी वर्ग | सवलत प्रमाण |
|---|---|---|
| | हद्दीतील अंध व्यक्ती | |
| ४. | कोल्हापूर महानगरपालिका हद्दीतील अपंग, मूकबधीर, कर्णबधीर, मतीमंद प्रवासी | ५० टक्के |
| ५. | वाजवी खप असणाऱ्या वर्तमानपत्रांचे वार्ताहर | १०० टक्के |
| ६. | को.म.न.पा. हद्दीतील व के.एम.टी. कार्यक्षेत्रातील ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक. | ५० टक्के |

**परिवहन उपक्रमाच्या विविध सवलत पास योजना खालीलप्रमाणे आहेत :**

## ✸ श्री महालक्ष्मी सवलत पास योजना ✸

### एक दिवसीय पास फक्त रु.४०/-
(दिवसभरात कोठेही, कधीही आणि कितीही प्रवासाची मुभा)
हा पास प्रत्येक बसमधील कंडक्टर व स्टॉप बुकिंग कंडक्टरकडे ओळखपत्राआधारे उपलब्ध.

### एक दिवसीय पास (अर्ध आकार) फक्त रु.२०/-
(दिवसभरात कोठेही, कधीही आणि कितीही प्रवासाची मुभा)
हा पास प्रत्येक बसमधील कंडक्टर व स्टॉप बुकिंग कंडक्टरकडे ओळखपत्राआधारे उपलब्ध.

### साप्ताहिक पास फक्त रु.१८५/-
(आठवडाभरात कोठेही, कधीही आणि कितीही प्रवासाची मुभा)

### पाक्षिक पास फक्त रु.३६०/-
(पंधरवड्यात कोठेही, कधीही आणि कितीही प्रवासाची मुभा)

### मासिक पास फक्त रु.७००/-
(महिनाभरात कोठेही, कधीही आणि कितीही प्रवासाची मुभा)

### त्रैमासिक पास फक्त रु.१,७५०/-
(तीन महिन्याच्या कालावधीसाठी कोठेही, कधीही आणि कितीही प्रवासाची मुभा)

### २० दिवसाच्या भाड्यात ३० दिवस प्रवास
(नियमित प्रवाशांना त्यांचे मागणीनुसार मार्गावर एकवेळ येणे व जाणेसाठी)

# संगणकीकृत सवलत पास ✸

## संगणकीकृत फोटो ओळखपत्र, सवलत पासेस योजना व प्रचलित विविध प्रकारच्या पासेसच्या दरांची माहिती दर्शविणारा तक्ता

(१) फोटो ओळखपत्र .. रु.१५/- (विद्यार्थ्यांसाठी) (वैधता एक वर्ष)

(२) फोटो ओळखपत्र .. रु.२०/- (नियमित प्रवाशांसाठी) (वैधता एक वर्ष)

(३) पहिली ते सातवीपर्यन्तचे विद्यार्थी (नवीन योजना) .. रु.१५५/- प्रति महिना

(४) आठवी ते दहावीपर्यन्तचे विद्यार्थी (नवीन योजना) .. रु.२१०/- प्रति महिना

अकरावी ते पदव्युत्तर, डी.एड्., बी.एड्., वैद्यकीय, अभियांत्रिकी, आय.टी.आय. आणि शिवाजी विद्यापिठाअंतर्गत असणारे सर्व पूर्ण वेळ कोर्सेस, शहर/जिल्ह्याबाहेर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ''५० टक्के सवलतीचे पासेस''चे दर तसेच एकाच मार्गावर नियमित प्रवास करणाऱ्या नियमित प्रवाशांसाठीच्या ''२० दिवसांच्या प्रवास भाड्यामध्ये ३० दिवस प्रवास'' पासेसचे दर दर्शविणारा तक्ता.

| अ.क्र. | स्टेज | ५० टक्के सवलत पासेसचे दर | २० दिवसाचे भाड्यात ३० दिवस प्रवास पासेसचे दर |
|---|---|---|---|
| (१) | ०१ | २२०.०० | २९०.०० |
| (२) | ०२ | २५०.०० | ३३०.०० |
| (३) | ०३ | ३१०.०० | ४१०.०० |
| (४) | ०४ | ३४०.०० | ४५०.०० |
| (५) | ०५ | ३७०.०० | ४९०.०० |
| (६) | ०६ | ४३०.०० | ५७०.०० |
| (७) | ०७ | ४९०.०० | ६५०.०० |
| (८) | ०८ | ५५०.०० | ७३०.०० |
| (९) | ०९ | ५७०.०० | ७७०.०० |
| (१०) | १० | ६१०.०० | ८१०.०० |

| अ.क्र. | स्टेज | ५० टक्के सवलत पासेसचे दर | २० दिवसाचे भाड्यात ३० दिवस प्रवास पासेसचे दर |
|---|---|---|---|
| (११) | ११ | ६४०.०० | ८५०.०० |
| (१२) | १२ | ६७०.०० | ८९०.०० |
| (१३) | १३ | ७००.०० | ९३०.०० |
| (१४) | १४ | ७३०.०० | ९७०.०० |
| (१५) | १५ | ७६०.०० | १०१०.०० |
| (१६) | १६ | ७९०.०० | १०५०.०० |
| (१७) | १७ | ८२०.०० | १०९०.०० |
| (१८) | १८ | ८५०.०० | ११३०.०० |
| (१९) | १९ | ८८०.०० | ११७०.०० |
| (२०) | २० | ९१०.०० | १२१०.०० |

**ओळखपत्र, विद्यार्थी पास तसेच इतर सवलत पास मिळणेचे ठिकाण - गंगावेश आणि महाराणा प्रताप चौक येथून आठवड्याच्या सर्व दिवशी सकाळी ८.०० ते रात्रौ ८.०० वा. पर्यन्त.**

(सर्व प्रकारचे सवलत पाससाठी के.एम.टी. ओळखपत्र आवश्यक)

**कोल्हापूर शहरातील शारदीय नवरात्रोत्सवाच्या कालावधीत तसेच समूह आरक्षण केल्यास :**

- श्री दुर्गादर्शन व कोल्हापूर दर्शन ही विशेष बस सेवा किमान ४० प्रवासी उपलब्ध झाल्यास उपलब्ध करुन देणेत येईल. श्री दुर्गादर्शन बस सेवा तिकीट दर प्रति प्रवासी रु. ९०/- व अर्धआकार तिकीट दर प्रति प्रवासी रु. ४५/-

- बस सेवा क्षेत्रातील शालेय सहली, लग्नसमारंभ इ. कार्यक्रमांसाठी मागणी व उपलब्धतेनुसार विषेश बस सेवा उपलब्ध. यासाठी छ.शिवाजी महाराज चौक येथील वाहतूक नियंत्रण केंद्राशी स.८.०० ते सायं.८.०० या वेळेमध्ये संपर्क साधून माहिती घेता येईल तसेच बुकींग करता येईल.

केंद्रीय भूपृष्ठ मंत्रालयाचे अधिपत्याखालील ए.एस.आर.टी.यू

या परिवहन उपक्रमाच्या शिखर संस्थेकडून जाहिर होणारे विविध बाबींमधील उत्कृष्ठ कामगिरीबद्दल १० वर्षे राष्ट्रीय स्तरावरील प्रथम क्रमांकाचे विविध पुरस्कारानी सन्मानित

- 1993 - Passenger Safety (City) Award
- 2001-2002 - Highest Performance in Vehicle Productivity
- 2002-2003 - Highest Performance in Vehicle Productivity
- 2003-2004 - Tyre performance Award for max. improvement
- 2003-2004 - Lowest operational cost Award without element of tax
- 2003-2004 - Highest Performance in Vehicle Productivity
- 2004-2005 - Highest Performance in Vehicle Productivity
- 2004-2005 - Lowest operational cost award without the element of tax
- 2006-2007 - Highest Performance in Vehicle Productivity
- 2007-2008 - Highest Performance in Vehicle Productivity
- 2011-2012 - Highest Performance in Vehicle Productivity
- 2013-2014 - Highest Tyre Performance
- 2014-2015 - Highest Tyre Performance

**सेवा आपुलकीची - बांधीलकीच्या नात्याची**